| MHKO050051992021 | नियमित फौजदारी खटला क्रं. ५२९/२०२१, निशाणी क्रं.१४ वरील आदेश महाराष्ट्र सरकार / डॉ.विवेक सदाशिव बन्ने |
|---|---|

आरोपीतर्फे प्रस्तुतचा अर्ज मोबाईल कंपनीकडून कॉल डिटेल्स मिळणेसाठी संबंधीत कंपनीला आदेश करावा यासाठी केला आहे.

२. आरोपीचे कथन असे की, फिर्यादीने दि.१६/०२/२०२१ रोजी तिचा आरोपीने विनयभंग केलेबाबतची तक्रार शहापूर पोलीस ठाण्यात दि.२७/०२/२०२१ रोजी खोट्या नाट्या मजकुराने दाखल केली. आरोपीचा ओप्पो कंपनीचा मोबाईलमध्ये airtel व jio कंपनीची अशी दोन prepaid चे सिमकार्ड असून त्याचा क्रमांक ९८९०८३२४२६ व ७९७२१३७७०३ आहे. त्याबाबत दि.२७/०२/२०२१ रोजी त्याने शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गु.र.नं.११४/२०२२ ची फिर्याद दिली असून त्या गुन्ह्यातील आरोपींनी त्याचा मोबाईल व त्यातील कार्ड काढून घेवून त्याला मारहाण केल्यावरुन सदर फिर्याद त्याने दिली. दि.१६/०२/२०२१ ते दि.२६/०२/२०२१ चे दरम्यान त्याच्या संबंधित मोबाईल कंपनीकडून वर नमूद नंबरचे call details report कोर्टात सादर करणेबाबत संबंधित कंपनीला आदेश करावेत, आरोपीला त्याचे निर्दोषत्व सिध्द करणेसाठी सदरचे call details report फिर्यादी व साक्षीदार यांच्या उलटतपास घेतेवेळी आवश्यक आहेत, सबब, सदरचा अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

३. सरकारी वकीलांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले असून आरोपीने त्याचे अर्जामध्ये नमूद केलेप्रमाणे गु.र.नं.११४/२०२२ अन्वये शिवाजीनगर पोलीस ठाणेत फिर्याद दिली असलेबाबत केलेले कथन योग्य वाटत नाही, call details चा

या खटल्याशी कोणताही संबंध नाही, या गुन्ह्याचा शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्याशी कोणताही संबंध नाही व तसा आदेश संबंधित कंपनीला करणे योग्य नसून तशी विनंती अर्जाव्दारे मागण्याचा अधिकार आरोपीसनाही, सबब, अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

४. आरोपीचे विधीज्ञ यांनी युक्तीवाद केला की सदर कॉल डिटेल्स आरोपीला मिळणे आवश्यक आहेत, त्यावरुन आरोपी त्याचे प्रस्तुत गुन्ह्यातील निर्दोषत्व सिध्द करु शकेल. कॉल डिटेल्स हे आरोपीला मिळणार नाहीत. त्यामुळे अर्ज मंजूर करावा असे कथन केले. याउलट सरकारी वकीलांनी युक्तीवाद केला की, सदर गुन्ह्याचा व प्रस्तुत गुन्ह्याचा कोणताही संबंध नाही, त्यामुळे विनाकारण विलंब करण्यासाठी प्रस्तुत अर्ज दिला असल्याने तो खर्चासह नामंजूर करावा असा युक्तीवाद केला.

५. प्रस्तुत अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे, फिर्यादीचे व दाखल अन्य कागदपत्रांचे मी बारकाईने अवलोकन केले. आरोपीने नि.१५ सोबत गु.र.नं.११४/२०२१ शिवाजीनगर पोलीस ठाणे याचा प्रथम खबर अहवाल दाखल केला आहे. त्यानुसार आरोपीने त्याला प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादीच्या पतीने व सास–यांनी मारहाण केल्याचे, त्याच्या गाडीची काच फोडल्याचे, त्याचा ओपो कंपनीचा मोबाईल फोन, रोख रक्कम रुपये तीन हजार ते पाच हजार व दीड तोळ्याची सोन्याची चेन जबरदस्तीने काढून घेतल्याबाबत फिर्याद दिल्याचे दिसते. आरोपीने प्रस्तुत अर्जाव्दारे त्याच्याकडे असलेल्या वर नमूद दोन मोबाईल कंपन्याची सिमकार्ड प्रमाणे दि.१६/०२/२०२१ ते दि.२६/०२/२०२१ पर्यंतचे कॉल रेकॉर्डस मागितले आहेत. सरकारी वकीलांनी सदर गुन्ह्याचा व प्रस्तुत गुन्ह्याचा कोणताही संबंध नसल्याने व त्या क्रमांकातील कॉल डिटेल्सचा व या प्रकरणाचा कोणताही संबंध नाही

असा आक्षेप घेतला आहे. वर नमूद केल्याप्रमाणे या आरोपीने या प्रकरणातील फिर्यादीच्या पती व सास–याविरुध्द शिवाजीनगर पोलीस ठाण्यात स्वतः फिर्याद दाखल केली आहे. दोन्ही प्रथम खबर अहवाल पाहिले असता फिर्यादीने दाखल केलेला प्रथम खबर अहवाल हा दि.२७/०२/२०२१ रोजी १९.०१ वा. व आरोपीने दाखल केलेला प्रथम खबर अहवाल दि.२७/०२/२०२१ रोजी १०.३१ वा. दाखल केल्याचे दिसते. आरोपीने प्रस्तुत अर्जाव्दारे कॉल डिटेल्सची मागणी करताना त्याचे निर्दोषत्व सिध्द करण्यासाठी सदर कॉल डिटेल्स फिर्यादी व साक्षीदार यांचे उलटतपास घेतेवेळी आवश्यक असल्याचे कथन करुन त्यांची मागणी केली आहे.

६. प्रथमदर्शनी दोन्ही गुन्हे वेगवेगळे आहेत. प्रस्तुत प्रकरणात अद्याप पुरावा सुरु झालेला नाही. आरोपीने त्याला सदरचे कॉल डिटेल्स कोणत्या कारणासाठी आवश्यक आहेत याचा कसलाही उल्लेख प्रस्तुत अर्जात केलेला नाही. आरोपीने सदरचे कॉल डिटेल्स केवळ उलटतपास वगळता अन्य कोणत्या कारणाने प्रस्तुत प्रकरणाशी निगडीत आहेत याचा खुलासा केलेला नाही. आरोपीचा नेमका बचाव काय आहे अथवा त्या कॉल डिटेल्सशी कसा निगडीत आहे याचा कसलाही खुलासा प्रस्तुत अर्जातून होत नाही. तसेच, आरोपीने दाखल केलेली फिर्याद या प्रकरणात फिर्यादीने दाखल केलेली फिर्याद या क्रॉस केस आहेत असेही आरोपीचे कथन नाही. तसेच, वर नमूद केल्याप्रमाणे आरोपीने दाखल केलेला प्रथम खबर अहवाल हा प्रस्तुत प्रकरणात दाखल केलेल्या प्रथम खबर अहवालाच्या अगोदर असल्याने त्यातील कॉल डिटेल्स या प्रकरणाला कशा प्रकारे निगडीत आहेत याचा खुलासा होत नाही.

७. आरोपीतर्फे मा.राजस्थान उच्च न्यायालय यांचा ***Jasveer Vs. State of***

***Rajasthan***[1], या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवली आहे. मी त्यातील न्यायालयासमोर असलेले बाबीचे अवलोकन केले असता त्यामध्ये न्यायालयाने आरोपीविरुध्द कलम ३७६ चा गुन्हा चालू असताना आरोपीने त्याला त्याच्याविरुध्द सापडलेले व्हिडीओग्राफ दोषारोपासोबत मिळाले नव्हते म्हणून त्याची मागणी न्यायालयाने फेटाळल्याने मा.उच्च न्यायालयाने तसे व्हिडीओग्राफ आरोपीला मिळणे त्याचा मौलीक अधिकार असल्याचे ग्राह्य धरुन त्याबाबत साक्षीदाराला समन्स काढण्याची परवानगी दिली होती. प्रस्तुत प्रकरणात तशी कोणतीही बाब न्यायालयासमोर सरकारी पक्षाने ठेवलेली नाही. तसेच, सरकारी पक्षाने या प्रकरणातील फिर्यादी व आरोपीने मोबाईलवर संभाषण केले असा कोणताही मुद्दा फिर्यादीत नमूद केलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्जाव्दारे आरोपीने मागणी केल्याप्रमाणे कॉल डिटेल्स मागविणे गरजेचे दिसत नाही.

८. आरोपीतर्फे ***Ajay Nogare Vs. State of Madhya Pradesh***[2] या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवण्यात आली आहे. मी त्याचे अवलोकन केले असता त्यातील आरोपींनी प्ली ऑफ अलेबी चा बचाव घेतला होता म्हणून तो न्यायालयाने मंजूर केला. प्रस्तुत प्रकरणात तसा कोणताही बचाव आरोपीने घेतलेला नाही. त्यामुळे तो न्यायनिर्णय या प्रकरणाला लागू होत नाही.

९. आरोपीतर्फे ***Kamal Ahmed Mohammed Vakil Vs. State of Maharashtra***[3] या न्यायनिर्णयावर भिस्त ठेवण्यात आली. मी त्याचे अवलोकन केले असता सदर प्रकरणात सरकारी पक्षाने काही कागदपत्रावर भिस्त ठेवली नव्हती व ती कागदपत्रे मागवण्यासाठी आरोपीने अर्ज दिला असल्याने तो न्यायालयाने मंजूर केला.

---

1 2015(1) Cri.L.R. (Raj.) 526
2 2021(3) Crimes 137
3 2013(2) Bom.C.R. (Cri.) 217

त्यामुळे त्या प्रकरणातील बाबी या प्रकरणाशी जुळत नसल्याचे त्याचा लाभ आरोपीला घेता येणार नाही. सबब, वर नमूद सर्व कारणे व आरोपीने कोणत्या कारणासाठी अथवा कशा प्रकारे सदर कॉल डिटेल्स त्याला आवश्यक आहेत याचा खुलासा केला नसल्याने प्रस्तुत अर्ज मंजूर करणे अयोग्य दिसते. सबब, खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आ दे श

सदरचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

Digitally signed by PATWE DATARAJ GUNAJIRAO
Date: 2023.03.16 17:46:51 +0530

दिनांक :- १६/०३/२०२३. **(डा. डा. जा. पटवे),**

इचलकरंजी. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, (कोर्ट नं.१) इचलकरंजी.